Vol 6 Issue 10 July 2017

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

Review Of Research

ISSN: 2249-894X
Impact Factor : 3.8014(UIF)
Volume - 6 | Issue - 10 | July - 2017



# कुटुंबसदस्यांमधील संवाद : एक चिंतन

प्रा. डॉ. संतोष खंडारे
समाजशास्त्र विभाग प्रमुख , श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,
कारंजा (लाड) जि. वाशिम .

**सारांश :–**

आजकाल कौटुबिक संवाद हरवत चाललेला आहे. संवाद झालाच तर मोबाइल, संगणक/लॅपटॉप या माध्यमांतून त्यामुळे परस्परांशी बोलणे, संवादातून होणारे हावभाव त्यातून निर्माण होणारी माया आपुलकी ही देखील हरवत चालली आहे पण इतर संस्कृतीला विरोध न करता आपली संस्कृती जपून ती अधिक कशी व्यापक होईल याचा विचार आणि आचरण करणे ही खरोखरीच भविष्याची गरज आहे. कारण संवादातूनच एकमेकांचे विचार, मते प्रकट होत असतात. त्यातून सुशिक्षित सुदृढ कुटुंबव्यवस्था साकारत असते. स्वाभाविकच त्याचे समाजव्यवस्थेवर सुध्दा प्रतिबिंब उमटत असते. म्हणूणच कुटुंब आणि समाजव्यस्था पाहता अशा प्रबोधनाची नितांत गरज आहे.

समाज अतिप्राचीन असला तरी त्याचे अस्थित्व टिकून राहणे हे उचित प्रकारे होणा–या गरजांची पूर्ती यावर अवलंबून असते. व्यक्ती व समाज परस्पर संलग्नित आहेत. म्हणूनच सामाजिक संस्थाची निर्मिती झालेली असते. कुटुंब सदस्यांमधील एकरूपता म्हणजे कुटुंबसदस्याच्या संबंधामधील घनिष्ठता होय ही घनिष्ठता त्या व्यक्तींच्या संवादावर अंवलंबून असते. कुटंबसदस्यांमधील संवादाविषयी कुटुब प्रमुखांची महत्वाची भूमिका असते. कारण कुटुबप्रमुख हा कुटुबाचा शासक, पुरोहित, गुरू, शिक्षक, व्यवस्थापक असतो. शिक्षणाच्या प्रवाहामध्ये इंग्रजी माध्यमांमुळे कुटुबावर मातृभाषेचे (प्रादेशिक) जतन करण्याची जबाबदारी पूर्वीपेक्षा वाढली आहे. जागतिक स्पर्धेत टिकायचे झाल्यास इंग्रजी शिक्षण महत्वाचे आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्य इंग्रजी भाषा जाणतो असे नाही. त्यामुळे कुटुंबाची मातृभाषा आणि अन्य भाषा यांचा तालमेळ घालण्यासाठी कुटुंबात संवाद आवश्यक आहे. कुटुंबाच्या दिनचर्यात बदल होत आहे हे खरे पण वेळेनुसार व सोयीनुसार परस्परांमध्ये संवाद वााढविणे गरजेचे झाले आहे. कुटुंब सदस्यांच्या आवडीनिवडीमुळे कुटुंबप्रमुखांचे नियंत्रणा कमी होत आहे व कुटुबसदस्यांच्या वर्तन व्यवहारात असंतुलन निर्माण होत आहे. जर कुटुबसदस्यामधील संवाद कमी होत राहल्यास मानसिक व सामाजिक सुरक्षेत हास होईल म्हणून समाजातील बदलत्या परीस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता कुटुबसंस्थेत आहे. कुटुबाचे अस्थित्व व सातत्य हे कुटुबातील सदस्ययांमधील संवादावर अवलंबून असते.

## प्रस्तावना :'–

मानवाची माणूस म्हणुन घडण होण्यास कुटुंबाची महत्वाची भूमिका राहली आहे. अनादीकाळापासून या कुटुंबसंस्थेने समाजसातत्य टिकून ठेवले आहे. व्यक्तीचे संगोपन, संरक्षण व सामाजिकरण या मध्ये कुटुंबाचा महत्वाचा वाटा असतो. औद्योगिकीकरण, नागरीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या प्रक्रियेमध्ये विश्वाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य आहे खरे पण संस्काराचा पाया कुटुंबव्यवस्थेतच टिकून आहे.

कुटुंबाचे स्वरूप समाजानुरूप वेगवेगळे असते. मानवाच्या विविध अंगी जीवनारूपी साच्यात एकीच्या भावनेची अभिव्यक्ती आहे. वसुधैव कुटुंबकम ही उदातत व उच्च भावना आहे. यामुळेच माणसाच्या जीवनात विशिष्ट संस्कार व विकास घडवून आणण्यात कुटुंब महत्वाची भूमिका बजावते हे सत्य आहे.

कुटुंबसदस्यांच्या बौध्दीक वा वैचारीक विकासावर कुटुंबाचे सामाजिक स्थान ठरत असत. विकास हा संख्यात्मक व गुणात्मक असतो. अंत:प्रेरणा व बाहयप्रेरणा कुटुंबविकासावर परीणाम करतात. कुटुंबामध्ये आत्मविश्वास स्नेह, प्रेम, राग, देष, ईष्र्ा इ. भाव भावनांचा समावेश होतो, सदस्यांमध्ये एकमेकांशी असणारे सहसबंध गुणात्मक विकासाच्या ध्येयाने प्रेरित असावे लागतात. विकसित व प्रतिष्ठीत कुटुबाच्या सामाजिक स्थितीमागे आत्मविश्वास व अविरत प्रयत्न कारणीभूत असतात. सदस्यांमधील स्नेह, प्रेंम, एकमेकांशी सुसंवाद साधतो.

कुटुंबसंस्थेचे सद्याचे आधूनिक स्वरूप भविष्याचा वेध घेणारे असू शकते. आज वुध्दाश्रम, संस्कारकेंद्रे यांची समाजाला नुकतीच ओळख होवू लागली आहे जर कुटुंबातील सदस्यांमध्ये संवाद अंतर वाढत गेल्यास कुटंबुप्रमुखास मुलांच्या जडणघडणीस वेगळी तरतुद करावी लागेल. म्हणुन कुटुंबसदस्यामधील संवाद या विषयावरील चिंतंन हा प्रस्तुत शोणनिबंधाचा हेतू आहे.

## समस्या विधान :–

कुटुबव्यवस्थेतील संवाद अंतराचा मुलांच्या एकूणच व्यक्तीमत्वावर पडणारा परीणाम दिवसेंदिवस चिंतनाची बाब होत आहे. कुटबसदस्यामधील संवाद ही समस्या प्रत्येक कुटुंबामध्ये कमीअधिक प्रमाणात दिसून येते. आजच्या धावपळीच्या जीवनात शहरी तथा ग्रामिण भागात एकमेकांसोबत चारदोन तास बसण्याची वा बोलण्याची वेळ नसल्याचे दिसते. म्हणुन सदर समस्याचे चिंतन करणे गरजेचे वाटते.

### अध्ययनाचे उदिष्टे
१) कुटुसंस्थेतील सदस्याच्या दिनचर्यात झालेल्या परीवर्तनाचा आढावा घेणे.
२) कुटुबप्रमुखांच्या दर्जत ढालेल बदल अभ्यासणे
३) कुटुंबसदस्यामधील संवाद कमी झाल्याची कारणमिमांशा शोधणे
४) संवादकौश्ल्ये व वैयक्तीक विकास या विषयीच्या समस्यांचा शोधे घेणे.

### अध्ययनाचे गृहितकृत्ये :–
१) आजच्या युगात सामुहिक हितापेक्षा व्यक्तीगत हिताला प्राधान्या दिले जाते.
२) वाढत्या गरजांसोबत युक्तिवादाचा प्रभाव जाणवतो.
३) कुटुंबप्रमुखांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव कमी झालेला दिसतो.
४) कौटुंबिक संवाद कौशल्याचा सामाजिक संवाद कौशल्यावर परीणाम होतो

### संशोधन पध्दती :–
प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यात संदर्भ, ग्रंथ, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेट इ.

### विषय विश्लेषण :–
#### 1) कुटुंब व्यवस्थापन –
संगोपन एकमेकांच्या गरजांची सहकार्याने पूर्तता करणे , संस्कृतीची जपणूक करणे व भावी पिढयांवर आदर्श संस्कार करणे कुटुब सदस्यांचे व्यवहार नियमित करणे, एकमेकांशी कसे वागावे, त्यांना योग्य दिशा दाखविणे व सामाजिक विकासासाठी व्यवस्थापन व नियोजन महत्वाचे असते. वडिलोपार्जित संपदा संरक्षण व कुटुंबातील सदस्यांच्या सामाजिक व वैचारीक विकासाच्या दृष्टिने केलेली आखणी म्हणजे कुटुंब व्यवस्थापन होय. कुटुंब व्यवस्थापनाची जबाबदारी कुटुंगप्रमुंखाकडे असायची. सदस्य चांगल्या वागणूकिचे व्हावेत, तसेच सुसंस्कारीत व्हावेत याकरीता कुटुंबप्रमुख सर्वस्वपणाला लावत असतो. कुटुब व्यवस्थापनासंबंधी सदस्यांच्या गरजा महत्वाच्या असतात योग्य व आदर्श स्थिती होण्यासाठी कुटुंबातील उत्पन्नाचे स्त्रोत महत्वाचे ठरतात. मर्यादित उत्पन्नामध्ये वाढत्या गरजांची पूर्तता करणे शक्य न झाल्यास कुटुंब सदस्यांमध्ये वैचारीक मतभेद निर्माण होतात. परीणाम त्यांच्यातील संवाद अंतर वाढत जातो कुटुब व्यवस्थापनातील गरजापूर्तीमुळे स्वभाव प्रवृतीदोष जाणवू लागतो.

#### 2) सदस्यांमधील सहसंबंध
कुटुंब विकासाकरीता कुटुंबसदस्यांचे कर्तव्य महत्वाचे असते. व्यक्तीचा स्वभाव, सवयी, एकमेंकांशी स्नेहाचे, जिव्हाळयाचे संबंध यावर कुटुंब विकास अवलंबून असता. शांत विचारी व मनमिळावू स्वभावाची माणसे कुटुबात अधिक प्रिय असतात. उलट तापट, रागीट स्वभावाची व्यक्ती इतरांपासून दूर जातात. परिणाम त्यांच्यातील संवाद कमी होतो ती व्यक्ती एकटेपणाचा बळी ठरतो. एकमेकांमधील ऐक्यभाव कमी होतो कुटुंब हे सर्व सदस्यांशी संस्काराचे उगमस्थान असते.

#### 3) कुटुंब– प्लॅट संस्कृतीतील परिवर्तन
सुसंस्कारीत जीवन अंगीकारणे हितावह असते. स्वार्थ हा नाशाला कारणीभूत ठरतो. प्रत्येक सदस्यांनी स्वार्थत्यागी वृत्तीने वागणे गरजेचे असत. कुटुब नियमांचा दैनंदिन जीवनावर परीणाम होत असते. कौटुबिक विकासाकरीता सुसूत्रता व योग्य मार्गदर्शन असल्यास त्या कुटुबाचा गुणात्मक विकास होतो. भाषा, चालीरिती, रूढी, परंपरामुळे दोन पिढयांमधील व्यक्तींमध्ये संवाद निट होत नसल्याचे जाणवते. काही समजगैरसमजांमुळे एकमेकांना ऐकून घेतांना पुरेसा व्रवाद होत नाही. आधुनिक काळात भाषेची ओळख झाल्याने कुळाचाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. कुटुंब संस्कृतीतील संवाद प्लॅट संस्कृतीत दिसत नाही.

#### 4) आधुनिक अध्यापन पध्दती
प्रत्येक कुटुबाची जीवनशैली भिन्न स्वरूपाची आहे. पूर्वीची भाषा, रूढी, परंपरा ही कुटुंब विकासाची सामाजिक परिमाणे होती. ही परिमाणे कुटुंबाचा गुणात्मक विकास होण्यास कारणीभूत असत. शैक्षणिक संधीमुळे निश्चितच लाभ झाला. व्यक्तीला वेगवेगळया भाषा ज्ञात झाल्यात वैयक्तिक तसेच सामाजिक विकासास शिक्षण उपयुक्त ठरलंय. आज वेगवेगळया माध्यमांव्दारे, भाषेव्दारे व्यक्ती अध्ययन करत आहे मातृभाषेपेक्षा निश्चितच इतर भाषेमध्ये शिक्षणाचे आकर्षण अधिक वाढत आहे शाळा महाविद्यालयातून मिळणारे शिक्षण प्रभावि ठरत आहे. याचे प्रमुख कारण कुटुबामधील सदस्यामध्ये संवाद अंतर कमी झालेले दिसते. प्रत्येकांना त्यांच्या गुणकौशल्याच्या आधारे विकास करावसा वाटतो ते साहजिकच आहे त्यामुळे अध्ययन अध्यापनाचे नवनवीन कौशल्ये विकसीत होत आहे. त्यामुळे एकमेकांशी संवाद करणे अवघड होत आहे.

#### 4) वैयक्तिक भावविश्व
कुटुंबातील प्रत्येक सदस्यांना आपले स्वतंत्र व्यक्तीमत्व सिध्द करण्याची जिद विचार, स्वातंत्र एखाद्या कार्याविषयी साहस धाडसीपणा, जिज्ञासू प्रवृत्ती असे अनेक भाव सिध्द करण्याची प्रचंड इच्छा शक्ती यामुळे तो व्यक्ती अंतमुर्ख होवून समाजापासून अथवा कुटुबातील इतर व्यक्तीपासून दूर राहणे पसंत करतो. कौटुबिक कार्यात उत्स्फूर्तपणे सहभाग ठेवत नाही. सहवासाची उत्सुकता प्रेम यापासून अलिप्ततावादी धोरण अंगीकारतो यामुळे हा कमी संवाद भावी पिढयाच्या निर्मितीच्या दृष्टिने विकासास अपायकारक ठरतो.

#### 5) ध्येय प्राप्ती–
आजच्या व उद्याच्या जगात बरेच परीवर्तन होणार पण कोणते परीवर्तन होणार हे सांगणे अनिश्चित असते. व्यक्तीने जगायचे कसे त्याकरीता कोणते कौशल्ये आवश्यक आहेत याविषयीची अनिश्चिता फारच मोठी असते. नवीन मार्ग शोधण्याची गरज असते. तसेच ध्येय निश्चित करायची गरज असते. नवयुगात संवाद कौशल्यात अधिक भर द्यावा लागेल. संवाद कौशल्यामुळे नवीन प्रश्न सोडविण्याच्या प्रक्रिया नवीन संदर्भात

उपयोगी पडतील म्हणून कुटुंबाचा विकास हा कुटुबसदस्यांच्या सर्वागीण विकास असतो. अशक्य ध्येय साधण्याकरीता कोटुंबिक संवाद ध्येय प्राप्तीसाठी, निरनिराळया क्षमतांच्या वाढविण्यासाठी, प्रोत्साहन देण्याचे सुरक्षितेची भावना प्रदान करण्याचे काम कुटुबसदस्यांमध्ये चांगल्या संवादावर आधारीत असतो.

### *6) कौटुंबिक उपक्रम –*

कुटुबामध्ये कळत नकळत अनेक प्रसंग घडतात त्यामुळे कुटुबस्दस्याच्या विकासात भर पडत असते. कुटुंब प्रमुखांकडून नेहमी जाणीवपूर्वक काही सामाजिक विकासासाठी संधी निर्माण केली जाते. योग्य वर्तणूकीसंदर्भात कौतुक करणे यामुळे संवाद वाढतो. आज ग्रामीण, शहरी भागातून आपल्या मुलांवर परीणाम करणारे अनेक समूह दिसतात. काही नियोजन पूर्वक उपक्रम कुटुबात राववणे उदा. वाढदिवस कुटुंबातील संवाद बंधुतेच्या भावनेशी निगडीत असतो. कौटुंबिक रितीरिवाज पाळणे हा संवाद कौशल्याचा भाग बनतो.

आजचे जीवन वैज्ञानिक विकासावर आधारीत आहे माणूस हा स्वातंत्रप्रिय आहे उपजीविकेसाठी सतत धडपड करत असतो.विविध बंधने असली तरी जाचक ताणतणावातून मार्ग शोधण्याचा मनुष्य प्रयत्न करीत असतो. ज्ञान मिळवणे, वाटणे पध्दतशीर रचना करणे, सुखसमुध्दीसाठी, वर्चस्वासाठी वापर करणे, ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानाचा व्यवहार हा मानवी संस्कृतीचा एक महत्वाचा भाग आहे. आणि संस्कृती आपल्या जीवनाचा अविभाग्य घटक आहे सांस्कृतिक प्रवाहात फार मोठी स्थित्यंतरे होत आहेत. बदलत्या परिस्थितीत योग्य कौटुंबिक संवाद अपरिहार्य बाब झाली आहे

### *निष्कर्ष*

१) कुटुंब सदस्यांमधील संवाद अंतर कमी होण्यास कुटुबरचनेतील बदल कारणीभूत आहे अर्थातच सयुक्त कुटुंबाचे विभक्त कुटुब बनले.
२) व्यक्तीचे संवाद कौशल्ये विकसीत होण्यासाठी कौटुबिक वातावरण महत्वाचे ठरते कमी
३) कुटुंब ही व्यक्तीच्या जडणघणीची मुलभूत औपचारीक यंत्रणा आहे
४) कमी संवादरमुळे व्यक्तीमध्ये न्युनगंड निर्माण होतो न्युनगंड व्यक्तीगत व सामुहिक हितासाठी विद्रोही ठरतो
५) कमी संवादामुळे कुटुबसदस्यामध्ये परस्परांप्रती आदर्शाची भावना कमी होते व देषभावना उत्पन्न होते.
६) कुटुंबात सदस्यांमध्ये सहकार्याचे वातावरण असल्यास संवाद कौशल्ये वाढण्यास मदत होते
७) योग्य संवाद असल्यास मानसिक स्थिती स्वास्थ निरोगी राहण्यास बौध्दीक क्षमता वाढण्यास तसेच नैतिक विकासाच्या पायाभरणीस वाव मिळतो.
८) कौटुंबिक संवाद कौशल्याचा सामाजिक संवाद कौशल्यावर परीणाम होतो
९) नाती जपण्यासाठी संवाद आवश्यक असतो.
१०) संवादामुळे कुटुबसदस्याना नवीन परीस्थितीशी जुळवून घेण्यास पदत होते.
११) संवादामुळे उपजत बुध्दीला पोषक वातावरण मिळतो.
१२) संवादामुळे कुटुंबसदस्यामध्ये वर्तनसमस्या निर्माण होतात.
१३) कमी संवादामुळे व्यक्तीच्या प्रतिमेस धक्का बसतो.

### *संदर्भसूची :–*

१) कांडलकर सौ लिना – मानवविकास – विद्या प्रकाशन
२) जाधव, टण्णू, पाटील, चौधरी– भारतीय समाज – ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म.मु. वि. नाशिक
३) साठे, आपटे, लुकतुके – कुटंबस्वास्थ शिक्षण– ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म.मु. वि. नाशिक
४) लोटे चौहान भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स नागपूर
५) आगलावे प्रदिप सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे साईनाथ प्रकाशन नागपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com